प्रेसनोट जव्हार

दिनांक—११/०२/२०२६

**" गजानन जोहरे, ग्राम महसुल अधिकारी,सजा—जामसर व सिताराम इंधन,ग्राम महसुल अधिकारी,सजा—हिरडपाडा ता.जव्हार जि.पालघर यांना रुपये १०,०००/— रक्कमेची लाच स्विकारताना ला.प्र.वि.पालघर यांनी रंगेहात पकडले आहे. "**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर |
| **पो.स्टे./ गु.रजि.क्र./कायदा व कलम** | पो.स्टे.जव्हार स्टेशन डायरी क्र.१९/२०२६ दि.११/०२/२०२६ चे २०:३२ वा. |
| **गुन्हा दाखल तारीख वेळ** | गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| **तक्रारदार** | पुरुष तक्रारदार वय.३७ वर्षे |
| **आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | १) गजानन नागेश जोहरे, वय.४० वर्षे, पदनाम—ग्राम महसुल अधिकारी, सजा—जामसर,ता. जव्हार, जि.पालघर **(वर्ग—३)**<br>२) सिताराम विष्णु इंधन, वय.२५ वर्षे, पदनाम— ग्राम महसुल अधिकारी, सजा—हिरडपाडा,ता. जव्हार, जि.पालघर **(वर्ग—३)** |
| **आरोपी अटक** | आलोसे यांना दि.११/०२/२०२६ रोजी ताब्यात घेण्यात आलेले आहे. |
| **मागितलेल्या लाचेची रक्कम** | रू. २०,०००/— तडजोडीअंती रु.१०,०००/— |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | रू. १०,०००/— |

**थोडक्यात हकीगतः—** यातील तक्रारदार यांचे नावे प्रधानमंत्री आवास योजनेचे घरकुल मंजुर झालेले आहे. सदर घरकुल बांधण्यासाठी ते स्वतः दि.१०/०२/२०२६ रोजी लेंडी नदीमधुन रेती काढून आणत असताना रात्री ७:३० ते ८:०० वा.चे सुमारास दादर कोपरा गावाच्या पुढे आले असता ग्राम महसुल अधिकारी तथा तलाठी १) सिताराम इंधन २) गजानन जोहरे व इतर यांनी त्यांचा ट्रक्टर अडवून सदर ट्रक्टरवर वाळुचोरीची कारवाई न करता तो सोडुन देण्यासाठी ४०,०००/— रुपये लाचेची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना कसेबसे रु.२०,०००/— जमवुन दिले. सदर पैसे संबंधित ग्राम महसुल अधिकारी यांनी स्विकारुन उर्वरित रक्कम रुपये २०,०००/— दि.११/०२/२०२६ चे दुपारपर्यंत तक्रारदार यांनी दयावी या अटीवर तक्रारदार यांचा ट्रक्टर सोडुन दिला. त्यावेळी तक्रारदार यांना उर्वरित रुपये २०,०००/— दिले नाही तर **तुझा ट्रक्टर जप्त करुन जमा करु अशी जप्तीची धमकी** दिली.लोकसेवक मागणी करीत असलेली रक्कम ही लाच आहे अशी तक्रारदार यांची खात्री झाल्याने व तक्रारदार यांची कोणासही लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दि.११/०२/२०२६ रोजी ला.प्र.वि. पालघर येथे तक्रार केलेली आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि.११/०२/२०२६ रोजी करण्यात आलेल्या पडताळणीमध्ये तक्रारदार यांना लोकसेवकाने रु. २०,००० मागणी करुन रु.१०,०००/— स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दि.११/०२/२०२६ रोजी सायंकाळी आयोजित करण्यात आलेल्या सापळा कारवाईमध्ये तक्रारदार यांच्याकडुन लोकसेवक गजानन जोहरे व सिताराम इंधन यांना पंचासमक्ष रू. १०,०००/— रक्कमेची लाच स्विकारतांना रंगेहाथ पकडले असून त्याबाबत पो.स्टे. जव्हार, पालघर ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ (सुधारीत अधिनियम—२०१८) कलम ७, ७—अ व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

**सापळा पथक — पो.नि.श्री.राकेश डांगे, पोहवा/विलास भोये, योगेश धारणे, जितेंद्र गवळे**

**तपास अधिकारी— पोलीस उप—अधीक्षक श्री.दादाराम करांडे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर**

**मार्गदर्शक अधिकारी — मा.श्री. शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**
**मा.श्री.भागवत सोनवणे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**
**मा.श्री. सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पालघर यांचेशी संपर्क करावा.

---

**संपर्क पत्ता** :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय कक्ष क्र. १०८, प्रशासकीय इमारत—'ब', जिल्हा मुख्यालय, पालघर—बोईसर रोड, कोळगाव, ता. जि. पालघर. पिनकोड — ४०१४०४.

संकेतस्थळ :— https://www.acbmaharashtra.gov.in

ई—मेल :— dyspacbpalghar-mum@mahapolice.gov.in

टोल फ्री नं. :— 1064

व्हॉट्सअॅप क्र. :— 8857971064 / 9769691064

दुरध्वनी क्रमांक :— 02525-297297, 022-2081359, 022- 20813599

मोबाईल क्रमांक :— 8983217679/ 9004465175

( दादाराम करांडे )

पोलीस उप—अधीक्षक

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पालघर

मोबाईल नं.— 8983217679